साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 31 वे

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

**संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे**
**संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे**
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१५६ | पाने-१२ | दि.१५/१२/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.




# नवीन वर्षात पाणी टंचाईचे संकट - उजनी, कोळगावसह छोटे प्रकल्प तळपातळीकडे

करमाळा : सन २०२३ ला निरोप देताना तालुक्यातील पाणी प्रश्न गंभीर बनत चालला आहे. करमाळा तालुका शेती व पिण्याच्या पाण्यासाठी ज्या उजनीवर अवलंबून आहे, त्या उजनीचे पाणी शुन्य पातळीकडे जाण्याच्या मार्गावर आहे. सीना-कोळगाव प्रकल्पासह मांगी व अन्य छोटे तलावाची पाणी पातळी तळाकडे गेली आहे. त्यामुळे सन २०२४ चे स्वागत पाणी टंचाईने करावे लागणार आहे.

करमाळा तालुक्यातील ४५ गावाच्या शेतीला व पिण्याला ज्या उजनीचे पाणी वापरले जाते, त्या उजनीची पातळी रोज खाली जात आहे. गेल्यावर्षी २० डिसेंबर २०२२ रोजी उजनीची पाणी पातळी १०८ टक्के होती. यावर्षी पावसाळ्यात उजनीची पाणी पातळी ६६ टक्के झाली होती. २०२४ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूका होणार आहेत. त्यामुळे मतदारांना पाणी देण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी हे उजनीचे पाणी नियमबाह्य सोडण्याचा आग्रह करत आहेत. शासनाची स्थिती नाजूक आहे, लोकप्रतिनिधीच्या रेट्यापुढे शासन नमते घेते. त्याचा परिणाम म्हणून उजनीचे पाणी मोठ्या प्रमाणात सोडले आहे. सध्या उजनीची पातळी २० टक्केपेक्षा खाली गेली आहे. १ जानेवारी २०२४ पर्यंत धरण उणे टक्केवारीत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे करमाळा तालुक्यातील शेतीला पाणी व वीज दोन्ही गोष्टीची कमतरता भासणार आहे. याबाबीचा परिणाम करमाळा शहर व उजनीवरून केलेल्या सर्व पिण्याच्या पाणी पुरवठा योजनावर होणार आहे. दहीगाव उपसासिंचन योजनेलाही ब्रेक लागणार आहे. या सर्व बाबीचा परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नावर होणार आहे. तसेच बाजार समितीत येणारा चाराही कमी प्रमाणात येण्याची शक्यता आहे. मार्च नंतर पाणी टंचाईची तीव्रता वाढणार असून जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण होणार आहे. भविष्यातील पाणी टंचाई लक्षात घेता अनेक शेतकऱ्यांनी ऊस व अन्य पीक लागवडीचे क्षेत्रात कपात केली आहे.



सीना-कोळगाव प्रकल्पातील पाणी पातळी खालावली आहे. तालुक्यातील मांगी, म्हसेवाडी, नेरले, हिंगणी, राजुरी, वीट, कुंभेज, वडशिवणे आदी तलावातील पाणीसाठा संपला आहे. त्यामुळे गावागवातील जलस्त्रोत आटत चालले आहेत. नदी, पाझर तलाव, ओढे यांचे पाणी आटले आहे, त्याचा परिणाम विहीरीवर होत असून विहीरीचे पाणी दररोज खालीखाली जात आहे. मोटारी चालण्याची वेळ दररोज कमी होत आहे. या सर्व बाबीमुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच चाऱ्याचा प्रश्न मोठा बिकट होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच दखल घेऊन नियोजन केले पाहिजे. **....अतुल पाटील (डबल उपमहाराष्ट्र केसरी व मा.सभापती पंचायत समिती)**



शेतीला व्यापाराचा दर्जा दिल्याशिवाय शेती फायद्यात पडणार नाही...!

## संपादकीय.........................................!

# बळीराजा..!

यावर्षी ऊसाचे पीक कमी आहे, तरीही भाव सरासरी तीन हजार रूपये मे.टनापेक्षा जास्त नाही. मकाईने गेल्या वर्षीच्या उसाचे अद्याप पैसे दिले नाहीत. केळीला सरासरी २५ ते २८ रूपये किलो भाव आहे तर पोपईचे भाव निम्म्याने कमी झाले आहेत. कांदा भाव ४५ ते ५५ रूपये जाणारा एकदम १७ ते २५ रूपयावर आला आहे. या पीकाबरोबरच करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील १८ डिसेंबरचे भाव प्रती क्विंटल पुढीलप्रमाणे... उडीद- ५००० ते ७४०० रूपये, तुर-८९०० ते ९२५०, ज्वारी - ३००० ते ५५००, गहू-२२०० ते २५००, मका-२००० ते २२०० रूपये. प्रत्येक पीकाला हमीभाव दिलातर भाव टिकून राहतात. सध्याच्या या मालाच्या किंमती मुळातच कमी आहेत. काही धान्ये हमीभावाने शासनामार्फत अथवा संस्थेमार्फत खरेदी केली तर ते परवडते; पण त्याचे पैसे वेळेवर मिळत नाहीत. शेतकऱ्याला तर पैशाची गरज असते. त्यामुळे शेतकरी हमीभाव केंद्रापेक्षा 'व्यापाऱ्याकडे विकणे बरे' असे म्हणून कमी भावात माल विकतो.

द्राक्ष, केळी, लिंबु या फळाचे दर कायम वर-खाली होतात. दुध उत्पादक शेतकरी तर रसातळाला चालला आहे. पाण्याची बाटली १५-३० रूपये लिटर आणि दुध २८ रूपये लिटर शेतकरी कसा जिवंत रहाणार ?, पशुखाद्याच्या किंमती भरमसाठ, चाऱ्याच्या किंमती भरमसाठ, मजुरी व इतर खर्च याचा विचार केलातर शेतकरी कसा जिवंत राहणार ? हा खरा प्रश्न आहे. शासनाचे धोरण चुकीचे असल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे.

ज्याप्रकारे शासनाने कर्ज माफ केले पाहिजे हे खरे ! पण केवळ कर्जमाफ करून सर्वच चांगले घडेल; असे नाही. वीज बील माफ करून सर्वच होईल; असेही नाहीतर शेतकऱ्याला कर्ज फेडता आले पाहिजे, वीज बील भरता आले पाहिजे व मजुरांची मजुरी देवून, खते-बियाणे खरेदी करता आली पाहिजे व घरातील सर्व कार्यासाठी योग्य खर्च करता येतील; अशी त्याची ऐपत निर्माण केली पाहिजे. त्यासाठी गरज आहे शेतमालाला योग्य भाव व कमी खर्चात जास्त उत्पादन मिळण्यासाठीचे तंत्रज्ञान. त्यासाठी जाणत्या शेतकऱ्यांनी शेतकरी उभा राहण्यासाठी शेतीतील तंत्र आणि मंत्र सांगण्याची गरज आहे.

ज्या प्रकारे शेतकरी निसर्गानुसार त्याच्या कामाची विभागणी करतो. सुरुवातीला तो उन्हाळी पीके घेतो. त्यानंतर खरीप आणि खरीपानंतर रब्बी अशी पीके घेतो. खरंतर ही पारंपारीक शेती आहे. त्यात बदल होण्याची गरज आहे. पुर्वी नारळ, सुपारी, हापूस, फणस, अननस ही फळझाडे फक्त कोकणातच येतात; असे म्हणायचे पण अलीकडे अनेक शेतकऱ्यांनी त्याबाबत आपल्याकडे प्रयोग केले व त्यात ते यशस्वी झाले. कोकणातील फळे पश्चिम महाराष्ट्रात सर्वत्र येवू लागली आहेत. हापूस आंबा तर गावा-गावात फोफावला आहे. असे म्हटले जाते.. "इन्सान घर बदलता है। इन्सान लिबाज बदलता है ।(कपडे) इन्सान दोस्त बदलता है। इन्सान रिश्ते बदलता है। इन्सान सबकुछ बदलता है फिर भी परेशान क्यो..? क्यों की इन्सान खुदको नही बदलता।" थोडक्यात काय तर शेतकऱ्याने आता बदलण्याची गरज आहे. काहीजण म्हणतात.. तुम्हाला बोलायला काय लागतय ? बघा, राज्यात गोंधळ झाला. शेतकऱ्यांचा कांदा फेल गेला. तुरी-हरभरा-उडीद भाव नाही. ऊसापासून ते गव्हापर्यंत सर्व मालाचे भाव कमी आहेत. आम्ही रोज नव्या संकटाला सामोरे जातोय. ना देवाला दया, ना सरकारला माया. दुष्काळ काही पाठ सोडीना, दुष्काळ नसेल तर वीज पुरेशी मिळत नाही, खते-बियाणे प्रचंड महाग आहेत. अन्य खर्च काही थांबेना, जनावरांचा प्रश्न, पोरांच्या शिक्षणाचा प्रश्न, मुला-मुलींच्या लग्नाचा प्रश्न, खासगी देणेकऱ्यांचं देणं वाढतयच. उन्हाळ्यात पीकाला पाणी देताना पीकाचे पाणी एक दिवस चुकले तर सर्व बजेट चुकते त्यामुळे शेतीबाबत सतर्क राहण्याची गरज आहे. शेतीबाबत यापुर्वी केलेले प्रयोग, शेतीवर निर्माण झालेले ग्रंथ, यशस्वी शेतकऱ्यांची यशोगाथा याचा अभ्यास केला पाहिजे. त्यातून नक्कीच काही ना काही हाती आल्याशिवाय राहणार नाही.

सन १९०० साल सुरू झालं आणि अमेरिकेत कार्व्हर नावाचं एक वादळ जोरात उठलं होतं. कार्व्हर या निग्रो (गुलाम) कुळात जन्मलेल्या व्यक्तीने शेती म्हणजे उद्योग आणि व्यापार याचे केंद्र असल्याचे दाखवून दिले. त्यांनी शेतकऱ्यांना नवा संदेश दिला. तो म्हणजे.. "फक्त उत्पादन करू नका तर त्यावर पर्यायी उद्योग सुरू करा व उत्पन्न वाढवा." यासाठी त्यांनी कापसाचे उत्पादन वाढवले परंतू सर्वात जास्त काम त्यांनी भुईमूग शेंगदाण्यावर केले. त्या काळी भुईमूगाच्या शेंगदाण्याचे खारीमुरी व भाजीत शेंगदाणे वापरण्याशिवाय दुसरा वापर होत नव्हता. कार्व्हर यांनी शेंगदाण्यापासून चीज, आईस्क्रीम, केक आदी पदार्थ केले. एवढेच नव्हेतर शेंगदाण्याचे रासायनीक पृथक्करण व विघटन करून चरबी, रेझिन, साखर, शाई, बुट-पॉलीश, रंग, दाढीचा साबण, खत, मऊ गुळगुळीत कागद, कृत्रीम फरशा, ग्रीस, लोणी, प्लॅस्टीक, दूध, सौंदर्यप्रसाधने शांपू, व्हिनेगर, झटपट कॉफी, लाकडासाठी रंग, केसातील कोंडा काढण्याचे औषध, असे शेंगदाण्यापासून जवळ पास ३०० वस्तू तयार करण्याचे तंत्र कार्व्हर यांनी विकसीत केले. कार्व्हर म्हणत असे की, "जर शेतीत प्रगती करायची असेलतर पारंपरीक शेती व्यवसायावर अवलंबून न राहता, शेतीमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला पाहिजे. प्रगत ज्ञान शेतीत विकसीत करून त्याचा वापर करून उत्पादन वाढवले पाहिजे." आता या गोष्टीला १२० वर्षे झाली तरी आपण त्याबाबत अद्याप सावध झालो नाहीत; याचा निश्चितच विचार झाला पाहिजे.

आपल्याकडे शेतीसाठी पाण्याचा प्रश्न नेहमीच सतावतो. आपल्याकडे पावसाळ्यात पाणी कोठे सोडावे आणि उन्हाळ्यात कोठून आणावे ? हा प्रश्न असतो. याकरीता काही शेतकऱ्यांनी 'शेततळे' हा पर्याय चांगल्याप्रकारे सुरू केला आहे. थोडासा खर्चाचा पण हा प्रयोग फायद्याचा आहे. त्याला शासनाचे अनुदान कमी मिळते; पण पर्याय नाही. अडचणीच्या काळात पाणी व सोबत 'मत्स्य शेती' करता येते. अशाचप्रकारे प्रगत शेतीसाठी 'हरितगृह' ही एक चांगली संकल्पना आहे. हरितगृहामध्ये फुले, भाज्या, फळे घेतली जातात. हरितगृहाच्या सांगाड्याच्या रचनेला पारदर्शक पॉलीथीन कागदाचे अच्छादन असते. त्यामुळे पिकाचे वारा, पाऊस, तीव्र सुर्यप्रकाश आदीपासून संरक्षण होते. त्यामुळे पीकाची वाढ सर्वाधिक चांगली होते. हरीतगृहात अधिक कार्बनडाय ऑक्साईड तयार झाल्याने उत्पादन जास्त मिळते. हरितगृहामध्ये पाच घटक नियंत्रित केले जातात. त्यामध्ये सुर्यप्रकाश, तापमान, कार्बनडाय ऑक्साईड, आर्द्रता व हवेचे चलन वलन याचा समावेश असून या घटकावर नियंत्रण ठेवणे म्हणजेच हरीतगृहातील हवामान नियंत्रित करणे होय. कोणत्याही पीकाच्या वाढीसाठी केवळ भरपूर उजेडाची नव्हेतर योग्य प्रमाणात सावलीचीही गरज असते. हरितगृहात हे काम शेडींग स्क्रीनव्दारे केला जाते. या प्रयोगाने पीके लवकर तयार केली जातात. बाजारातील भाव मिळवण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. हरितगृहामध्ये वापरलेले पॉलीथीन फिल्ममुळे धुके प्रतिबंध, धुळ प्रतिबंध, पाकळ्या काळपट होण्यास प्रतिबंध होतो. वनस्पतीची वाढ होण्यासाठी योग्य हवामान, पाणी, खते, कीड व रोगापासून संरक्षण मिळाल्यास उत्पादन वाढ होते. हरितगृहाने वातावरण नियंत्रित ठेवले जाते. वातावरण नियंत्रित ठेवल्याने पीकाचे अधिक उत्पादन मिळते, उत्तम दर्जाचे उत्पादन मिळते, पीकाचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण होते, कमी मजूर जास्त काम करतात तसेच कमी पाण्यात जास्त उत्पादन घेता येते. हवेतील बाष्प, थंडी, बर्फवृष्टी, अतिउष्णता आदी बाबीतून पीकाचे संरक्षण या हरितगृहातून होते. औषधांचा खर्च खूपच कमी होतो, शिवाय खतही कमी लागते. याउलट मिळणारे पीक हे चौपट येते. या पार्श्वभुमीवर करमाळा तालुक्यात 'हरितगृह' उभारणी झाल्यास तालुक्यात फुले, भाज्य व फळांचे प्रमाण मोठ्या स्वरूपात मिळून आपली प्रगती मोठ्या प्रमाणात होऊ शकेल.

हरितगृहात रोपांची निर्मिती (नर्सरी)हा व्यवसायही मोठ्या प्रमाणात चालतो. पण कोणा एकट्या-दुकट्याला असे हरितगृह उभा करून त्यातून नफा मिळवणे अशक्य आहे. यासाठी किमान १० शेतकऱ्यांनी संघटीत होवून हरीतगृह उभारले पाहिजे. कच्चा माल आणणे, तज्ञांचे मार्गदर्शन, पाण्याचे नियोजन , तयार माल पाठवणे, वाहतूक सुविधा आदी बाबीसाठी शेतकरी संघटन महत्वाचे आहे.त्यासाठी खर्च कमी येतो. मार्केटींग करणे सोपे जाते, घेणाऱ्या ग्राहकालाही एकाच ठिकाणी अनेक प्रकार पहावयास मिळतात तसेच मजूरांनाही एकाच शेडमध्ये काम न करता अनेक शेडमध्ये काम करता येते व मालकालाही मजूराचा पगार कामापुरताच द्यावा लागतो. असे एक ना अनेक फायदे सामूहिक शेड केल्यास होतात.

काही शेतकरी 'सेंद्रीय शेती' करतात. अलीकडे सेंद्रीय शेतीचे महत्व वाढले आहे. कोणत्याही खताचा वापर न करता तयार केलेला भाजीपाला, गहू ,ज्वारी, ऊस पीकवला तर त्याला विशेष मोल दिले जाते. सेंद्रीय शेतीतील हुरडा भाव मारून जातो. याशिवाय प्रत्येक पदार्थाची किंमत अन्य पदार्थापेक्षा जास्त आहे. आज लोक पैशापेक्षा आरोग्याला महत्व देतात. त्यामुळे रासायनीक शेतीपेक्षा सेंद्रीय शेती आज गरजेची झाली आहे. जर शेतकरी खऱ्या अर्थाने बळीराजा व्हावे असे वाटत असेलतर प्रत्येकाने विशेष मेहनत घेतली पाहिजे एवढेच..!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# दत्त जयंतीनिमित्त फिसरे येथे अखंड हरिनाम सप्ताह

करमाळा(सं.प्र.) : श्री दत्त जयंतीनिमित्त फिसरे येथील औताडे वस्ती येथे २० डिसेंबर पासून अखंड हरिनाम सप्ताह व गुरूचरित्र पारायण सोहळा कार्यक्रम सुरू झाला आहे. या सप्ताहमध्ये दररोज पहाटे काकडा, सकाळी गुरूचरित्र पारायण, गाथाभजन, दुपारी भागवत कथा, हरिपाठ, रात्री किर्तन व त्यानंतर हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. तसेच या सप्ताहमध्ये ह.भ.प.उध्दव महाराज सबलस (शेवगाव), ह.भ.प.अक्षय महाराज शेळे (उपळवटे), ह.भ.प.विनोद महाराज रोकडे (कोळगाव), ह.भ.प.दिलीप महाराज मुळे (मांदळी), ह.भ.प.कुमार महाराज केमदारणे (लोणी), ह.भ.प.रविंद्र महाराज पोटे (श्रीगोंदा) यांचे किर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत. २६ डिसेंबरला सायंकाळी चार ते सहा या वेळेत ह.भ.प. सोपान (काका) महाराज टेंभूकर (पंढरपूर) यांचे श्री दत्त जन्मोत्सवाचे किर्तन होणार आहे. तसेच सप्ताहाच्या शेवटी २७ डिसेंबरला सकाळी नऊ ते अकरा ह.भ.प. सोपान (काका) महाराज टेंभूकर (पंढरपूर) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. या सप्ताहात दररोज सायंकाळी पाच ते सहा ह.भ.प.संतोष महाराज चोपडे यांच्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथा सांगितली जाणार असून सायंकाळी सहा ते सात आत्माराम बाबा वारकरी शिक्षण संस्था मांदळी यांचा हरिपाठ कार्यक्रम होणार आहे.

तरी या हरिनाम सप्ताहचा लाभ भाविकांनी घ्यावा; असे आवाहन आयोजक महादेव औताडे व सौ.अनिता महादेव औताडे यांनी केले आहे.

# किल्ला विभाग येथील श्री दत्तात्रय देवालयात श्री दत्त जन्मोत्सव

करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील किल्ला विभाग येथील जीर्णोध्दारीत श्री दत्तात्रय देवालय मध्ये सालाबाद प्रमाणे याहीवर्षी २६ डिसेंबरला सायंकाळी ६ वा. ०३ मि. श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. श्री दत्तात्रय देवालय हे पुरातन मंदिर असून, या मंदिराचा गेली अकरा वर्षापूर्वी जीर्णोध्दार करण्यात आला आहे. या मंदिराला समोरून गोल दरवाजा असून सकाळी सूर्य उगवल्यावर पादुका स्थानावर सूर्याचे किरण पडतात. या मंदिरात श्री च्या दर्शनासाठी दररोज सकाळी भाविकांची गर्दी असते. श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त २६ डिसेंबरला श्री ची पुजा, अभिषेक, आरती व प्रसाद वाटप असे कार्यक्रम होणार आहेत. सर्व भाविकांनी उपस्थित



असे आवाहन श्री दत्तात्रय देवालय समिती तर्फे करण्यात आले आहे.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी** फक्त **एव्हरफ्रेश सुपरमार्ट** मध्येच !
**भव्य डिस्काउंट ऑफर**
सर्व प्रकारच्या ब्रॅन्डेड वस्तु खरेदीवर कमीत कमी
**10% पासून 51% पर्यंत एमआरपीवर डिस्काउंट**
(ऑफर कालावधी : ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत)
सोबत लकी ड्रॉ व्दारे **1 ग्रॅम सोने** मिळविण्याची सुवर्णसंधी !



टीप : नियम, अटी व डिस्काउंट ऑफर समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
**एव्हरफ्रेश सुपरमार्ट**
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
। किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अ‍ॅन्ड स्वीटस् । बेकरी अ‍ॅन्ड मिल्क प्रॉडक्टस् ।
। नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अ‍ॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य ।
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

डॉ.नायकुडे यांचे **डोळ्यांचा दवाखाना** **श्रीजय नेत्र रूग्णालय**
**डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे** (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
**वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध**
**श्रीजय ऑप्टिकल** (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# शेलगाव(क) येथे संघर्ष महिला ग्रामसंघ कार्यालयाचे उद्घाटन



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत शेलगाव(क) येथे संघर्ष महिला ग्रामसंघाच्या कार्यालयाचे उद्घाटन तालुका अभियान व्यवस्थापक योगेश जगताप यांचे हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर प्रभाग समन्वयक आकाश पवार, प्रभाग संघ व्यवस्थापक शंकर येवले, हनुमंत पवार, माजी सरपंच अशोक काटुळे, उपसरपंच लखन ढावरे, सचिन वीर, ग्रामसेवक खाडे, ग्रामसंघाचे सचिव प्रियंका ढावरे, सीआरपी कविता वीर आदी मान्यवर उपस्थित होते. म.राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत शेलगाव(क) येथे २१ बचत गट कार्यरत असून त्यांचा संघर्ष महिला ग्रामसंघ बनविलेला आहे. या ग्रामसंघाची स्थापना १ जून २०१८ रोजी झाली होती. या संघासाठी ग्रामपंचायतीने समाजमंदिराची इमारत उपलब्ध करून दिली असून त्या इमारतीसाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा राजश्री शाहू शेतकरी बचत गटाने उपलब्ध करून दिल्या आहेत. कार्यालयासाठी सरपंच आत्माराम वीर, उपसरपंच लखन ढावरे, माजी उपसरपंच सचिन वीर, नागेश ढावरे यांनी महापुरूषांच्या प्रतिमा भेट दिल्या. मार्गदर्शन करताना तालुका अभियान व्यवस्थापक योगेश जगताप म्हणाले, की राज्य शासनाच्या वतीने महिला बचत गट व ग्रामसंघासाठी विविध योजना राबविल्या जात असून त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी मोफत प्रशिक्षण दिली जातात. त्याचा लाभ महिलांनी घ्यावा. आपल्या गटाचे व ग्रामसंघाचे रेकॉर्ड अद्यावत ठेवावे, बचत गट व ग्रामसंघाला उद्योग उभा करण्यासाठी शासकीय पातळीवरती मोठ्या प्रमाणावर अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे, कर्जपुरवठाही केला जातो. वांगी जि.प.गटामध्ये केळी पिकांवरती प्रक्रिया करणारी महिलांची कंपनी बचत गटाच्या माध्यमातून उभी राहत आहे. भविष्यकाळात अशा अनेक कंपन्या या गटांच्या माध्यमातून उभा राहतील; असे मत व्यक्त केले. सुत्रसंचालन डॉ.विकास वीर यांनी केले. यावेळी मंगल शिंदे, राणी शिंदे, कांताबाई जाधव, सुवर्णा जाधव, सविता काटूळे, ज्योती वीर, मंगल काळे, अनुराधा ढावरे, कोमल वीर, कविता वीर, सारीका वीर, राणी वीर, अश्विनी वीर, कोमल माने, वर्षा माने, सविता सपाटे, उषा सपाटे, सुनीता माने, आकांक्षा माने, त्रिशला वीर, आशा वीर, सचिता वीर, जयश्री शिंदे, रूपा बनसोडे, कल्पना वीर, निर्मला वीर यांचेसह महिला उपस्थित होत्या.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !



२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
**सुभद्रा पॉवर सोल्युशन्स**
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

**प्लॉट विकणे आहे**
पुणे रोड डांबरीटच असलेले पाच गुंठे व होसिंग प्लॉट मधील १ गुंठा प्लॉट विकणे आहे
संपर्क : 9423237685

# दत्त जयंतीनिमित्त माळीगल्ली येथे अखंड हरिनाम सप्ताह

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील माळीगल्ली येथील श्री दत्तस्मृती चितानंद गुरूकृपा मंदिरात दत्त जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहमध्ये काकडा, गुरूचरित्र पारायण, किर्तन व हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे. सप्ताहाचे व्यासपीठ चालक म्हणून कानिफनाथ महाराज आगम हे काम पाहणार आहेत. या सप्ताह मध्ये नंदकुमार महाराज शहाणे, बबन महाराज विंचू, दिनेश महाराज किरवे, कानिफनाथ महाराज आगम, राधाताई महाराज भांडवलकर यांचे किर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत. २६ डिसेंबरला दुपारी चार ते सहा बबन महाराज विंचू यांचे श्री दत्त जन्मोत्सवाचे किर्तन होणार असून २७ डिसेंबरला दुपारी एक ते तीन या वेळेत महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. तसेच या सप्ताहात दररोज दुपारी तीन ते पाच या वेळेत महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. तरी या सप्ताहाचा लाभ भाविकांनी घ्यावा; असे आवाहन श्री दत्तस्मृती चितानंद गुरूकृपा मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोलापूर जिल्हा नियोजन समितीवर ॲड.सावंत यांची निवड



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्हा नियोजन समितीवर पंचायत समिती चे माजी सदस्य व हमाल पंचायतचे अध्यक्ष ॲड.राहुल सावंत यांची निवड झाली आहे. याबाबत निवड समितीने पत्र दिले आहे. जिल्ह्यातून पाच अशासकीय सदस्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ॲड.राहुल सावंत यांचा समावेश आहे.

ॲड.सावंत यांच्या निवडीचे पत्र जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिले आहे. ॲड.सावंत हे हमाल पंचायतचे अध्यक्ष असून शेतकरी, शेतमजुर व कामगार यांच्या हिताचे काम करतात. पंचायत समितीचे सदस्य म्हणून त्यांची कारकिर्द गाजलेली आहे. वकिल म्हणूनही सर्वसामान्य नागरीकांना न्याय देण्याच्या दृष्टीने ते तत्पर असतात.

> सोलापूर जिल्हा नियोजन समिती मध्ये निवड झाल्याने करमाळा तालुक्यात विशेष काम करण्याची संधी मिळालेली आहे. आमदार संजयमामा शिंदे यांच्या माध्यमातून वेगवेगळी कामे सुचवून व ती मंजूर करून तालुक्यात वेगळे काम करण्याचे आपले धोरण आहे. करमाळा शहरातील नागरीकांचे व तालुक्यातील ज्येष्ठ मंडळींचे पाठबळ असून या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली आपण योग्य ते काम करू.
>
> ...ॲड.राहुल सावंत

कै.सुभाष आण्णा सावंत यांचा वारसा ते यथार्थपणे चालवत आहेत. विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांच्या शिफारशीनुसार त्यांची निवड झाली आहे. ॲड.सावंत यांच्या निवडीनंतर

# 'दो धागे श्री राम के' उपक्रमात ॲड.प्रियाल आगरवाल यांचा सहभाग

करमाळा(सं.प्र.) : अयोध्येत श्रीराम मंदिराचे काम प्रगतीपथावर असून लवकरच श्रीराम लल्ला मंदिरात विराजमान होणार आहेत. यानिमित्त देशभरात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून पुणे येथे श्रीराम जन्मभुमी मंदिरातील श्रीराम मुर्तीसाठी कापड विणण्याचे काम सुरू असून विविध समुदायाचे लोक या उपक्रमात सहभाग घेत आहेत. या उपक्रमासाठी करमाळा येथून ॲड.प्रियाल आगरवाल यांनी सहभाग नोंदवला. भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांच्या मार्गदर्शनाखाली



ॲड.प्रियाल आगरवाल यांनी हेरिटेज ॲन्ड विव्हींग रिव्हायवल चॅरिटेबल ट्रस्ट येथे जाऊन स्वत: हातमागावर रेशीम विणून श्रीराम मुर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमासाठी करमाळ्याचे प्रतिनिधीत्व निभावले आहे.


आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२



न्यु संगम हॉटेल & बेकर्स
प्रोप्रा : संदीप चुंग (9860670816)



मिठाई, नमकीन बरोबर आता
▪ वाढदिवसाचे केक
▪ सुट्टी खारी, टोस्ट, बटर, ब्रेड
▪ मस्का पाव व वाटी केक
मिळतील. एकवेळ अवश्य भेट द्या..!



पत्ता : पंजाब वस्ताद चौक, करमाळा.


## जयवंतराव जगताप यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

# करमाळा आगारासाठी ३० नवीन बस द्याव्यात



करमाळा(सं.प्र.) : करमाळा आगारातील बसची दुरवस्था झाली असून, उपलब्ध बस कमी पडत आहेत. करमाळा एसटी आगारासाठी तातडीने ३० नवीन बस उपलब्ध करून द्याव्यात; अशी मागणी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे निवेदनाव्दारे केली.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात श्री.जगताप यांनी म्हटले आहे, की करमाळा एसटी आगाराकडे बसची संख्या कमी असून ज्या आहेत त्यात देखील नादुरूस्तीचे प्रमाण जास्त आहे. सुस्थितीतील बसची संख्या कमी असल्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. करमाळा आगाराला लांब व जवळच्या पल्ल्यासाठी एकूण ८५ बसची आवश्यकता असताना ६५ बस उपलब्ध आहेत. त्यातील १० नादुरूस्त आहेत. त्यामुळे गाड्या फेल होणे, रद्द होणे असे प्रकार वारंवार घडत आहेत. पास काढलेले शालेय विद्यार्थी, रूग्ण व प्रवाशांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. शासनाने महिला व ज्येष्ठांना सवलतीच्या दरात प्रवास सुविधा दिल्यामुळे एसटीकडे प्रवाशांचा ओढा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परंतु बसची संख्या व त्यातही सुस्थितीतील बसची संख्या अपुरी आहे. अत्यावश्यक सेवेतील भाग असल्यामुळे शासनाने करमाळा बस आगारासाठी तातडीने ३० नवीन बस उपलब्ध कराव्यात; अशीही मागणी श्री.जगताप यांनी केली आहे.

# भारत हायस्कुलच्या सन १९७४-७५ मधील माजी विद्यार्थ्यांचा जानेवारी मध्ये स्नेहमेळावा

## विद्यार्थ्यांनी स्वत:ची माहिती नोंदविण्याचे आवाहन

करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील भारत हायस्कुल मधील सन १९७४-७५ या शैक्षणिक वर्षात जे नववी, दहावी व जुनी अकरावी या वर्गात शिक्षण घेत होते, अशा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात येणार आहे. तरी वरील शैक्षणिक वर्षात ज्यांनी शिक्षण घेतलेले आहे; अशा सर्व माजी विद्यार्थी, विद्यार्थीनींनी अब्दुल गणी शेख (९८९०५७०११५), विलास जेऊरकर (९८२३०५१०१२) यांच्याकडे आपले नाव, गाव इ. ची माहिती नोंदवावी; असे आवाहन माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याच्या आयोजकांनी केले आहे.


MEHER EYE & DENTAL HOSPITAL
मेहेर नेत्र ॲन्ड दंत हॉस्पिटल
बायपास रोड, शिंदे हॉस्पिटल शेजारी, करमाळा. मो.७८७५६१९६९६

| डॉ.हितेश बाळासाहेब मेहेर | डॉ.नेहा हितेश मेहेर(देवकर) | डॉ.पुनम शैलेश मेहेर(गोरे) |
| --- | --- | --- |
| MBBS. MS OPHTHALMOLOGY | BDS (DENTAL SURGEON) | BDS (DENTAL SURGEON) |

• कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी
• मोतीबिंदू, काचबिंदू(फेको) स्पेशालिस्ट
• अद्ययावत ऑपरेशन थिएटर
• रूट कॅनाल ट्रीटमेंट,
• कवळी बसविणे, बालदंत समस्या
• हिरड्यांची शस्त्रक्रिया

अनंत ऑप्टीशियन्स
डॉ.आंबेडकर शॉपींग सेंटर, भाजी मंडई जवळ करमाळा.(९४२३३३३९६०, ९९६०९७७३०६)
सर्व प्रकारच्या नंबरचे चष्मे, गॉगल्स मिळतील. अत्याधुनिक मशिनद्वारे चष्मे फिटींग

## विकासकामाच्या जोरावर

# आगामी विधानसभा निवडणूकीत आ.शिंदे यांना पुन्हा संधी मिळणार : राजेंद्र बारकुंड



करमाळा (सं.प्र.) : आमदार संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नातून करमाळा तालुक्यातून अनेक प्रलंबित प्रश्न व विकासकामे मार्गी लागत असून, त्याचा प्रत्यय नुकताच नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनातून दिसून आला आहे. जातेगाव ते टेंभूर्णी रस्ता, तालुक्यातील विविध गावासाठी तलाठी व सर्कल कार्यालयाच्या इमारतीसाठी दिलेला निधी, ग्रामीण भागातील रस्ते, कुकडीचे आवर्तन, दहिगावचे चालू पाणी यामुळे आमदार शिंदे यांच्या कामावर तालुक्यातील जनता खुश असून आगामी येणाऱ्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार संजयमामा शिंदे हेच पुन्हा आमदार होतील; असा विश्वास जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड यांनी व्यक्त केला आहे.

आ.शिंदे यांच्या विविध विकास-कामाबाबत माहिती देताना श्री.बारकुंड सा.संदेशशी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की आ.शिंदे हे आमदार झाल्यापासून करमाळा तालुक्यात सर्व शासकीय कार्यालयातील हस्तक्षेप बंद झाला असून, सर्व अधिकाऱ्यांना कोणत्याही दडपणाशिवाय व कमिशनशिवाय काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांची कामे होण्यात अडथळा येत नाही. कोरोनाचा काळ सोडलातर आ.शिंदे हे नेहमीच विकासकामात अग्रेसर राहिले आहेत. करमाळा तालुक्याच्या दृष्टीने दहिगाव उपसासिंचन योजना व कुकडी योजना या अतिशय महत्वाच्या असून, या योजनेचे पाणी मिळण्यासाठी आमदार शिंदे यांनी काटोकाट प्रयत्न केला आहे.

आ.शिंदे यांच्या कालावधी दहिगाव उपसासिंचन योजना कायमस्वरूपी चालू राहिली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे. ५ डिसेंबर रोजी दहिगाव उपसासिंचन योजनेच्या बंद नलिका वितरण प्रणाली कामाचा शुभारंभ नुकताच झाला आहे. यामुळे ५ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. तसेच कुकडीचे आवर्तनही शेतकऱ्यांना मिळत आहे. पश्चिम भागातील महत्वाच्या डिकसळ पुलाचा प्रश्नही मार्गी लावला असून या पुलाचेही काम चालू झाले आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात करमाळा तालुक्यातील रस्त्यासाठी ६८ कोटीचा निधी आ.शिंदे यांनी मंजूर केला आहे. या निधीतूनच जेऊर-शेटफळ-चिखलठाण-कुगाव या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला असून या रस्त्यासाठी १० कोटी ४० लाख रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. चिखलठाण गावातील तलाठी कार्यालयासाठी १५ लाखाचा निधी आ.शिंदे यांच्या माध्यमातून मंजूर झाला आहे. तलाठी व सर्कल कार्यालयासाठी संपूर्ण तालुक्यात ४ कोटी २० लाखाचा निधी आ.शिंदे यांनी मंजूर केला आहे. आमदार निधीबरोबरच इतर नवीन बांधकामासाठी आ.शिंदे जवळपास १२० कोटी रूपयाच्या आसपास निधी तालुक्यासाठी मंजूर करून आणला आहे. याबरोबरच रस्ते, वीज, पाणी या समस्या सोडविण्याचे नेहमीच काम चालूच आहे. याशिवाय ऊसाचा प्रश्नही कारखान्याच्या माध्यमातून आ.शिंदे यांनी सोडविला आहे. या सर्व विकासकामामुळे येणाऱ्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार संजयमामा शिंदे यांनाच पुन्हा संधी मिळेल; असा विश्वास श्री.बारकुंड यांनी व्यक्त केला आहे.

# करमाळा आगारातील वरीष्ठ लिपिक संजय माने यांचे निधन



करमाळा (सं.प्र.) : येथील आगारातील वरीष्ठ लिपिक संजय बाबा माने (वय-५१) यांचे अल्प आजाराने निधन झाले आहे. श्री.माने यांना मेंदूला रक्तपुरवठा होत नसल्याने शुक्रवारी सोलापूर येथील काटीकर हॉस्पिटलला उपचारासाठी नेले होते. उपचार चालू असतानाच आज दुपारी साडेतीन वाजता दवाखान्यातच त्यांचे निधन झाले आहे. गेल्या आठ महिन्यापूर्वीच त्यांच्या एका मुलाचे निधन झाले होते. त्यांच्या मागे आई-वडील, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. नगरपालिकेतील बांधकाम विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी बाबा माने यांचे ते चिरंजीव होते.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
होलसेल साडी डेपो
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
दिवाळीनिमित्त खास ऑफर...
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट)
मो.7387832186
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील



खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.


# केंद्रीय दुष्काळी पथकाकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी



करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्यातील घोटी, वरकुटे, नेरले, सालसे येथे केंद्रीय दुष्काळी पथकाने दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. पथकाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची तसेच विहिरीच्या पाणी पातळीची देखील पाहणी केली. येथील तलावाची पाहणी केल्यानंतर केंद्रीय पथकाला दुष्काळाची तीव्रता निदर्शनास आली. यावेळी वरकुटे येथील शेतकरी मौला मुलाणी यांनी साहेब.. दुष्काळी परिस्थिती निर्माण झालीया.., चारा नाही.., जनावरांना काय घालायचं ?... ना शेतीला, प्यायला पाणी नाही... सांगा आम्ही कसं जगायचं...? असा प्रश्न उपस्थित करत केंद्रीय पथकासमोरच धाय मोकलून रडायला सुरूवात केली. यावेळी प्रांताधिकारी आंबेकर, तहसीलदार शिल्पा ठोकडे, गटविकास अधिकारी देविदास सारंगकर, तालुका कृषी अधिकारी संजय वाकडे, नायब तहसीलदार विजयकुमार जाधव, भाजपाचे गणेश चिवटे, माजी सरपंच दादासाहेब भांडवलकर व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी वाकडे यांनी तालुक्यातील दुष्काळी परिस्थतीची आकडेवारी केंद्रीय पथकासमोर सादर केली. यावेळी तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी भरवी मदत करावी; अशी मागणी केली आहे.

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी डी.फार्मसी झालेला प्रतिनिधी पाहिजे. तसेच बारावी किंवा पदवीधर पर्यंत शिक्षण असलेला क्लार्क पाहिजे. गरजूंनी संपर्क साधावा !
संपर्क....
मो.9011355389

श्री गजानन अगरबत्ती
- सुगंधी अगरबत्ती
- कापूर
- अत्तर
- धूप
- भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !





पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

## वर्ष १८ वे


नमो ज्ञानेश्वरा । नमो ज्ञानेश्वरा ॥ निवृत्ती उदारा सोपानदेवा ॥


दत्त माझी माता, दत्त माझा पिता । बहिण बंधू चुलता दत्त माझा ॥

आपणांस कळविण्यास आनंद होत आहे की..
सालाबादप्रमाणे याहीवर्षी
श्री दत्त जन्म उत्सवानिमित्त


समचरण दृष्टी विटेवरी साजरी । तेथे माझी हरि वृत्ती राहो ॥


तुकाराम तुकाराम । नाम घेता कापे यम ॥

# अखंड हरिनाम सप्ताह व गुरूचरित्र पारायण सोहळा

**दैनंदिन कार्यक्रम :** पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ८ ते ११ गुरूचरित्र पारायण, सकाळी ११ ते १२ गाथाभजन, दुपारी ४ ते ५ भागवत कथा, सायं.६ ते ७ हरिपाठ, रात्री ७ ते ९ किर्तन व रात्री ९ नंतर भोजन व हरिजागन(संगीत भजन)

**ह.भ.प.संतोष महाराज चोपडे यांचे दररोज भागवत कथा (सायं ५ ते ६)**

**आत्माराम बाबा वारकरी शि.संस्था मांदळी यांचे दररोज हरिपाठ कार्यक्रम (सायं ६ ते ७)**

**बुधवार दि.२०/१२/२०२३**

किर्तनकार : ह.भ.प.उध्दव महाराज सबलस, शेवगाव
जागर : सालसे, साडे, फिसरे भजनी मंडळ

**गुरूवार दि.२१/१२/२०२३**

किर्तनकार : ह.भ.प.अक्षय महाराज शेळके, उपळवटे
जागर : सौंदे, शेलगाव भजनी मंडळ

**शुक्रवार दि.२२/१२/२०२३**

किर्तनकार : ह.भ.प.विनोद महाराज रोकडे, कोळगाव
जागर : हिवरे, हिसरे भजनी मंडळ

**शनिवार दि.२३/१२/२०२३**

किर्तनकार : ह.भ.प.दिलीप महाराज मुळे, श्री क्षेत्र मांदळी
जागर : पांडे, अर्जुननगर भजनी मंडळ

**रविवार दि.२४/१२/२०२३**

किर्तनकार : ह.भ.प.कुमार महाराज केमदारणे, लोणी

**सोमवार दि.२५/१२/२०२३**

किर्तनकार : ह.भ.प.रविंद्र महाराज पोटे, श्रीगोंदा

**मंगळवार दि.२६/१२/२०२३**

सायं ४ ते ६ दत्तजन्माचे किर्तन होईल.
किर्तनकार : गाथामुर्ती ह.भ.प.सोपान (काका)महाराज (टेंभुकर) पंढरपूर
जागर : नामदेव लोंढे(अंबीजळगाव), माऊली निंबाळकर, सचिन गटकुळ

**बुधवार दि.२७/१२/२०२३**

सकाळी ९ ते ११ काल्याचे किर्तन
किर्तनकार : गाथामुर्ती ह.भ.प.सोपान (काका) महाराज (टेंभुकर) पंढरपूर

**आपले नम्र : समस्त फिसरे ग्रामस्थ व भजनी मंडळ, फिसरे**
**सौजन्य : श्री दत्तकृपा एंटरप्रायजेस्, श्री दत्तकृपा इन्फ्रा डेव्हलपर्स**

तरी या हरिनाम सप्ताहाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा ही नम्र विनंती !


श्री.महादेव औताडे (सप्ताह नियोजक)


सौ.अनिता महादेव औताडे (सप्ताह नियोजक)



लोकनियुक्त सरपंच



मा.श्री.राजेंद्र बारकुंड (माजी उपाध्यक्ष, जि.प.सोलापूर)


मा.श्री.विकास गलांडे (चेअरमन, चिखलठाण सोसायटी)

उपसरपंच



चिखलठाण ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच पदी
# सौ.धनश्री विकास गलांडे
व उपसरपंच पदी
# सौ.राजाबाई शिवाजी मारकड
यांची निवड झाल्याबद्दल तसेच नूतन ग्रा.पं.सदस्यांचे
## हार्दिक अभिनंदन !

**सदस्य** - हेमंत बारकुंड, योगेश सरडे, अक्षय सरडे, आनंद पोळ, संभाजी कांबळे ठकूबाई राजेंद्र चव्हाण, मनिषा जाडकर, सुमन मनोहर गव्हाणे, गोजरबाई पांडूरंग सरडे

शुभेच्छुक • जाणता राजा मित्र मंडळ, चिखलठाण • युवराज राजेंद्र बारकुंड मित्र मंडळ, चिखलठाण



॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥
सहावे पुण्यस्मरण
तृतीय पुण्यस्मरण
कै.नामदेव(बापू) रघुनाथ सपकाळ
संस्थापक/अध्यक्ष, न्यु यशवंत शि.प्र.मंडळ सालसे
28 डिसेंबर
कै.आदिनाथ पंढरीनाथ नायकुडे
माजी सचिव, न्यु यशवंत शि.प्र.मंडळ सालसे
सालसे येथील न्यु यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक/अध्यक्ष
कै.नामदेव (बापू) रघुनाथ सपकाळ
यांचे सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त व संस्थेचे माजी सचिव
कै.आदिनाथ पंढरीनाथ नायकुडे
यांचे तृतीय पुण्यस्मरण दिनानिमित्त आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !
शोकाकुल
न्यु यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, सालसे
सर्व संस्था पदाधिकारी व सपकाळ परिवार
लाल बहादुर शास्त्री विद्यालय, सालसे
मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

भावपूर्ण श्रध्दांजली
कै.चंद्रकांत कुंडलिक इंदुरे सर
(मृत्यू दि.१८/१२/२०२३)
मनी होता प्रेमळपणा, कधी नाही दाखविला मोठेपणा
चेहरा होता हसतमुख, गेलात निघून अचानक
उरली नाही साथ आम्हाला, आठवण येते क्षणाक्षणाला
पुर्नजन्म घ्यावा तुम्ही आमच्यासाठी हीच ईश्वर चरणी प्रार्थना !
ज्येष्ठ साहित्यिक, माजी प्राचार्य व करमाळा भूषण
कै.चंद्रकांत कुंडलिक इंदुरे सर यांचे नुकतेच निधन झाले.
ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो; हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !
दशक्रिया विधी : बुधवार दि.२७/१२/२०२३ रोजी सकाळी
अहिल्याबाई होळकर घाट, नवी सांगवी, पुणे येथे होणार आहे.
शोकाकुल समस्त इंदुरे परिवार, करमाळा/पुणे




सदस्य, सोलापूर जिल्हा नियोजन समिती
पंचायत समितीचे मा.सदस्य, हमाल पंचायतचे अध्यक्ष व आमचे मित्र
ॲड.राहुल(भाऊ) सुभाष सावंत
यांची सोलापूर जिल्हा नियोजन समितीवर
सदस्य पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
ॲड.सचिन दादाराम लोंढे
ॲड.सुहास जगन्नाथ मोरे
ॲड.नवनाथ बाळनाथ राखुंडे
ॲड.प्रशांत बलभिम पवार

# करमाळा भूषण व बालसाहित्यिक चंद्रकांत इंदुरे यांचे निधन



करमाळा (सं.प्र.) : येथील रहिवाशी व पुणे येथे कार्यरत असलेले व ज्यांना करमाळा भूषण पुरस्कार देण्यात आला असे ज्येष्ठ साहित्यिक, माजी प्राचार्य चंद्रकांत इंदुरे (वय-८३) यांचे वृध्दपकाळाने १८ डिसेंबरला पहाटे राहत्या घरी सांगवी (पुणे) येथे निधन झाले. चंद्रकांत इंदुरे सर हे हिंदी माध्यमिक विद्यालय पुणे येथे शिक्षक म्हणून कार्यरत होते. याच विद्यालयात प्राचार्य म्हणून ते १९९९ ला सेवानिवृत्त झाले. त्यांनी संत तुकाराम, महात्मा गांधी यांचेवर पुस्तके लिहिली आहेत. तसेच साने गुरूजी कथामाला त्यांनी शेवटपर्यंत चालवली. महाराष्ट्रातील अनेक गावात, शाळेत, महाविद्यालयात जाऊन साने गुरूजीवरील कथा व व्याख्याने देत असत. पुणे येथील सैनिक स्कुल तसेच न्यु मिलीयम इंग्लीश स्कुल या शाळांवर ते मार्गदर्शक म्हणून कार्यरत होते. बालसाहित्यिक म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांच्या या कार्याची जाणीव ठेवूनच करमाळा येथील ग्रामसुधार समितीने करमाळा भूषण हा पुरस्कार त्यांना दिला आहे. स्वातंत्र्यसैनिक व माजी आमदार नामदेवराव जगताप यांचे ते साडूभाऊ होते तर माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे ते काका होते. सांगवी येथील स्मशानभुमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. अभियंता अनिल इंदुरे व ट्रॅव्हल्स कंपनीचे मालक सतीश इंदुरे यांचे ते वडील होत

### उत्कृष्ट कविता संग्रहासाठीचा राज्यस्तरीय

# २४ डिसेंबरला बुधभूषण पुरस्कार वितरण सोहळा

करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुका साहित्य मंडळाच्या वतीने उत्कृष्ट कविता संग्रहासाठीचा राज्यस्तरीय बुधभूषण पुरस्कार कवयित्री प्राजक्ता वेदपाठक यांच्या 'तू चिरंतन कविता माझी' या काव्यसंग्रहास जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण २४ डिसेंबरला सायंकाळी साडेचार वाजता विजयश्री सभागृह यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे हे राहणार असून, प्रमुख पाहूणे म्हणून विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलींद फंड, स्त्रीरोग तज्ञ डॉ.कविता कांबळे उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमात काव्य लेखन स्पर्धेतील कवी इंजि.मधुकर खडके स्मृती पुरस्कार (शालेय गट), गुरूवर्य सुमेरसिंग परदेशी स्मृती पुरस्कार (महाविद्यालयीन गट) व प्राचार्य प्रभाकर बिडवे स्मृती पुरस्कार (खुला गट) याचेही वितरण करण्यात येणार आहे. तसेच गावगाडा पुरस्कार समितीचे संस्थापक अध्यक्ष व साहित्यिक सोमनाथ टकले, संतोष मंजुळे यांचाही विशेष सन्मान केले जाणार आहे. यावेळी ज्येष्ठ कवी काडवानकार प्रकाश लावंड यांची प्रकट मुलाखत ज्येष्ठ पत्रकार डॉ.ॲड.बाबुराव हिरडे हे घेणार आहेत. तरी या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन करमाळा तालुका साहित्य मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### श्री दत्त जयंतीनिमित्त

# वाघाचीवाडी येथे नामजप व किर्तन सोहळा


करमाळा(सं.प्र.): श्री दत्त जयंतीनिमित्त वाघाचीवाडी येथे नामजप व किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार २५ डिसेंबर पासून सकाळी नऊ ते अकरा पारायण, नामजप, काकडा, हरिपाठ, प्रवचन, किर्तन, भजनी मंडळाचा हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. तसेच याच दिवशी रात्री ह.भ.प.शिवराम महाराज बिडवे (पारेवाडी) यांचा किर्तनाचा कार्यक्रम होईल. २६ डिसेंबरला सकाळी दहा ते बारा ह.भ.प.योगीराज रणजित(बापू) महाराज (अरणगाव) यांचे श्री दत्तजन्माचे किर्तन होईल. दुपारी साडेबारा वाजता पुष्पवृष्टी होऊन महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


गीर गाईचे प्युअर दुध मिळेल.
मो.9822058106


करमाळ्यात प्रथमच आपल्या सेवेत...
सचिन महामुनी
रियल ईस्टेट रेन्टल एजन्सी
आपल्या घरासाठी किंवा दुकान गाळ्यासाठी आपल्याला हवा तसा भाडेकरू मिळवून देणारी व आपल्याला हवे तसे घर व दुकान गाळा किंवा ऑफिससाठी जागा भाडेतत्वावर मिळवून देणारी **सचिन महामुनी रियल ईस्टेट रेन्टल एजन्सी**
आजच संपर्क साधा : मो.9158744810
पत्ता : सुभाष चौक, करमाळा., जि.सोलापूर

### २५ डिसेंबर पर्यंत मकाईने थकीत ऊस बिल न दिल्यास

# जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढणार : प्रा.रामदास झोळ



करमाळा(सं.प्र.) : मकाई सह. साखर कारखान्याचे थकीत ऊस बिल २५ डिसेंबर पर्यंत कसल्याही परिस्थितीत देणार असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे मार्फत मकाईचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी सांगितले आहे. जर २५ डिसेंबर पर्यत थकीत ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न केल्यास सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढणार; असा इशारा दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी दिला.

उमरड येथील ग्रामपंचायत कार्यालयात मकाई कारखाना शेतकरी सभासदांची बैठक पार पडली. त्यावेळी प्रा.झोळ बोलत होते. या बैठकीला आदिनाथ कारखान्याचे माजी चेअरमन वामनराव बदे, अंजनडोहचे माजी उपसरपंच शहाजी माने, दिलीप मुळे महाराज, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र गोडगे यांचेसह कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा.झोळ म्हणाले, की करमाळा तहसील कार्यालयावर ८ डिसेंबर रोजी थु थु आंदोलन केले. यावेळी बेमुदत आंदोलन करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आमचा आग्रह होता. परंतु जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी मकाई कारखाना २५ डिसेंबर पर्यंत कसल्याही परिस्थितीत बिल देणार असल्याचे सांगितले. या विनंतीस मान देऊन आम्ही आंदोलन स्थगित केले. आम्हाला वाटले की.. २५ डिसेंबरच्या अगोदर शेतकरी सभासदाच्या खात्यावर बिल जमा होईल परंतु अद्यापही मकाईचे चेअरमन, कार्यकारी संचालक व संचालक मंडळ यांच्याकडून कुठल्याही प्रकारच्या हालचाली दिसून येत नाहीत. एकंदरीत परिस्थिती बघता मकाई शेतकरी सभासदांचे पैसे कसे देणार ? हा प्रश्न आहे. त्यांनी जर २५ डिसेंबरच्या आधी ऊसाचे बिल दिले तर आम्ही सर्व शेतकरी बांधव त्यांचा सत्कार करू. बागल गटाचे युवा नेते दिग्विजय बागल यांनी त्यांच्या चेअरमन पदाच्या काळामध्ये ही बिले थकीत ठेवली आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला आहे. २५ डिसेंबर पर्यंत थकीत ऊस बिल न दिल्यास याचा मोठा उद्रेक होऊन अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने याची दखल घेऊन कारखान्यास २५ डिसेंबर पर्यंत ऊस बिल देण्याबाबत सुचित करावे अन्यथा त्यांच्यावर कारवाई करावी तसेच मालमत्तेवर बोजा चढवून कारखान्याची मालमत्ता जप्त करून शेतकऱ्यांना ऊस बिल तात्काळ मिळवून देण्यास सहकार्य करावे; अशीही मागणी प्रा.रामदास झोळ यांनी केली आहे.

पदमावती देवी महिला ना.सह.पतसंस्था मर्या; करमाळा
तात्काळ सोनेतारण कर्ज योजना
आमचे पतसंस्थेमार्फत गरजूंसाठी
तात्काळ सोनेतारण कर्जाची सोय उपलब्ध केली आहे.
दरमहा फक्त 1% व्याजदराने कर्ज
रू.40 ते 45000 पर्यंत प्रति तोळा रक्कम मिळेल !
पत्ता : गुजरगल्ली, करमाळा. मो.9421063921
* नियम व अटी लागू

## तलाठी व सर्कल कार्यालयाच्या बांधकामासाठी
# ४ कोटी २० लाखाचा निधी मंजूर : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यासाठी अतिशय महत्वाचा विषय असलेल्या महसुल विभागातील मंडल अधिकारी व तलाठी कार्यालय बांधकामासाठी आमदार संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नातून डिसेंबर २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये ४ कोटी २० लाख रूपये निधी मंजूर झाला आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शहरामध्ये हेलपाटे घालण्याची आता आवश्यकता राहणार नाही; अशी माहिती आ.संजयमामा शिंदे यांनी दिली.

प्रत्येक ग्रामपंचायतीला ग्रामपंचायत कार्यालय असते; परंतु तलाठी कार्यालय तालुक्यामध्ये जवळपास नाहीतच. जी आहेत ती मोडकळीला आलेली आहेत किंवा ग्रामपंचायतीच्या आश्रयाने उभी आहेत. ही अडचण लक्षात घेऊन आ.शिंदे यांनी तलाठी व सर्कल कार्यालय बांधकामासाठी प्रत्येकी १५ लाख रूपये प्रमाणे २८ बांधकामासाठी ४ कोटी २० लाख रूपये निधी मंजूर केला आहे. त्यानुसार करमाळा, जेऊर, केम, सालसे, अर्जुननगर, कोर्टी, केत्तूर व उमरड येथे मंडल अधिकारी कार्यालय होणार आहेत. तसेच देवळाली, जातेगाव, वांगी, निंभोरे, गुळसडी, कंदर, घोटी, पांगरे, आवाटी, साडे, कोळगाव, करंजे, रावगाव, वीट, जिंती, हिंगणी, कात्रज, चिखलठाण, वाशिंबे व शेटफळ येथे तलाठी कार्यालय होणार आहेत.

# सालसे येथील घाडगेवस्ती येथे दत्तजयंतीनिमित्त किर्तन सोहळा



करमाळा(सं.प्र.) : श्री दत्तजयंती निमित्त सालसे येथील राजगड फार्म हाऊस, घाडगेवस्ती येथे २६ डिसेंबरला भव्य किर्तन सोहळा व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रक्तदान शिबीराबरोबरच समाजप्रबोधनकार, झी टॉकिज फेम व शिवचरित्रकार ह.भ.प.विनोद रोकडे महाराज (कोळगावकर) यांचे सायंकाळी तीन ते पाच या वेळेत किर्तन होणार आहे. ६ वा. १० मि. श्री दत्त जन्मोत्सव होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. तरी याचा लाभ भाविकांनी घ्यावा; असे आवाहन आयोजक दादासाहेब घाडगे यांनी केले




# करमाळा तालुक्यात केळी संशोधन केंद्र उभारावे
## नारायण पाटील यांचे मुख्यमंत्री यांना निवेदन



करमाळा(सं.प्र.): तालुक्यात केळी संशोधन केंद्र व्हावे; यासाठी माजी आमदार नारायण पाटील यांनी राज्याच्या प्रमुखांना साकडे घातले असून, नागपूर येथे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन दिले आहे.

करमाळा तालुक्यातील केळी या पिकाचे वाढते उत्पादन लक्षात घेऊन मागील काही वर्षापासून माजी आमदार पाटील हे केळी संशोधन केंद्रबाबत सतत मागणी करत आहेत. यामुळे श्री.पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन प्रत्यक्षात या कामाची गरज का आहे.. हे मागील दोन वर्षाचा पीकपाणी अहवाल मांडून पटवून दिली. सन २०२१-२२ मध्ये ६७६१ हेक्टर क्षेत्रावर केळी उत्पादन घेण्यात आले तर सन २०२२-२३ मध्ये यात वाढ होऊन केळी लागवड क्षेत्र हे ६९७८ हेक्टर क्षेत्रावर जाऊन पोहचले आहे. या भागातील केळी उत्पादन क्षमता ही सरासरी हेक्टरी ६९ टन इतकी आहे. जवळपास ६४ हजार मे.टन केळी या भागातून बाजारपेठेत जाते. यामुळे या भागातील केळी उत्पादकांना तसेच राज्यातील केळी उत्पादकांना केळीबाबत नवनवीन तंत्रज्ञान आणि संशोधन याबाबत माहिती मिळावी आणि जेणेकरून केळी उत्पादन वाढून जागतिक बाजारपेठेत राज्यातील केळीला मागणी असावी; यासाठी शेलगाव (वांगी) येथे एक केळी संशोधन केंद्र व्हावे; अशी मागणी या निवेदनातून नारायण पाटील यांनी केली आहे. या संशोधन केंद्रासाठी जागेची उपलब्धता असून जवळपास ६८ हेक्टर जमीन ही म.फुले कृषी विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासन यांच्या मालकीची येथे असल्याचेही श्री.पाटील यांनी सांगितले. याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर माजी आमदार नारायण पाटील यांच्या या मागणीला महत्व असल्याचे दिसून येत आहे. तर या कामाचा पाठपुरावा आपण निरंतर चालू ठेवणार असल्याचे श्री.पाटील यांनी सांगितले.

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल येथे क्रिडा सप्ताह



करमाळा(सं.प्र.) : खेळाडूंच्या पाठीशी बिले परिवार सदैव उभा राहणार; असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे माजी प्राचार्य जयप्रकाश बिले यांनी केले.

झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल येथे क्रिडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी प्राचार्य बिले बोलत होते. स्पर्धेचे उद्घाटन पांडूरंग वाघमारे यांचे हस्ते झाले. यावेळी बोलताना वाघमारे म्हणाले, की खेळाडूंनी स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा. कारण खेळणे हा मुलांचा नैसर्गिक अधिकार असून खेळाने शरीराचा व मनाचा विकास होतो. तसेच शरीराचे स्वास्थ टिकून राहते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत डॉ.स्वाती बिले यांनी केले तर प्राचार्य खराडे यांनी आभार मानले.

न्यु. प्रविण सुपर मार्केट

- नं.१ २१८९ गहू - ३५ रू. किलो
- बाजरी नं.१ - ३५ रू. किलो
- ज्वारी भारी - ५५ रू. किलो
- सिवर गहू - ४५ रू. किलो
- जोड गहू - ७० रू. किलो

आरोग्यासाठी गावरान कडधान्य भाव...

- मटकी गावरान बारीक – १२० रू. किलो
- मटकी मोठी – ९० रू. किलो
- चवळी – १०० रू. किलो
- मसुर बेस्ट – ८० रू. किलो
- वटाणा – १०० रू. किलो
- बारीक गावरान मुग – ११० रू. किलो
- पाणीपुरी वटाणा – ८० रू. किलो
- काबोली हरभरा – १२० रू. किलो
- गावरान हरभरा – ६० रू. किलो
- नं.१ राजमा – ८० रू. किलो
- मसुर डाळ – ९० रू. किलो

ड्रायफ्रुट...

- नं.१ बदाम – ६५० रू. किलो
- काजु – १६० रू. पावकिलो
- अंजीर – २५० रू. पावकिलो
- पिस्ता – २५० रू. पावकिलो
- काळा मणुका – ९० रू. पावकिलो
- मणुका भारी – ६० रू. पावकिलो
- खजुर बॉक्स – १५० किलो
- पॅकींग खजुर – ७५ रू. अर्धा किलो
- भारी खजुर – १४० रू. किलो
- महावीर पापड – ११० रू. पॅकींग
- जोड गहू – ७० रू. किलो
- खोबरं – १२० रू. किलो
- पॉपकॉर्न मका – ३५ रू. पावकिलो
- पाणीपुरी – २५ रू. पावकिलो
- पाणीपुरी वटाणा – २० रू. पावकिलो
- गावरान बारीक मोहरी – ९० रू.किलो
- आरोग्यासाठी नाचणी – ७० रू. किलो

सर्व किराणा माल होलसेल भावात मिळेल व घरपोच केला जाईल.

संपर्क
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष
# अभिषेक आव्हाड यांची जिल्हा बैठकीत नेतृत्वाची चुणूक



करमाळा(सं.प्र.): करमाळ्याचे सुपुत्र व मध्यमवर्गीय कुटूंबातून आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे करमाळा शहर सचिव ते जिल्हाध्यक्ष या पदावरती आपल्या कामाच्या जोरावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विश्वासाला सार्थ ठरवत सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करत गाव तेथे राष्ट्रवादी व घर तेथे राष्ट्रवादी पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागून आगामी लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीतसाठी तसेच पक्षसंघटना वाढीसाठी सर्वांनी जोमाने काम करण्याचे अभिषेक आव्हाड यांनी केले.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिपक साळुंखे, माजी आमदार राजन पाटील, प्रदेश सरचिटणीस लतीफ तांबोळी, अल्पसंख्यांका प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुर्हाण, सोलापूर शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, माळशिरसचे नेते उत्तम जानकर, सहकार शिरोमणी कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, बार्शीचे निरंजन भूमकर, मंगळवेढ्याचे रामेश्वर मासाळ, अजित जगताप, राजेंद्र हजारे, महिला प्रदेश सरचिटणीस सुवर्णा झाडे, सोलापूर शहर युवक अध्यक्ष सुहास कदम, श्रीकांत शिंदे, युवक कार्याध्यक्ष अक्षय भांड, रमेश पाटील तसेच राष्ट्रवादीचे जिल्ह्यातील व गावपातळीवरील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. एकंदरीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड यांनी जिल्ह्याच्या बैठकीत आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवली आहे. कार्यकर्ता जर प्रामाणिक असेल व त्याने आपल्या पक्षाचे काम प्रामाणिक केले तर खऱ्या अर्थाने त्याला व त्याच्या नेतृत्वाला नक्कीच न्याय मिळतो.आज जिल्ह्यातील बड्या नेत्यांच्या बैठकीमध्ये अभिषेक आव्हाड यांनी आपल्या वक्तृत्वाची छाप पाडली आहे. आमदार संजयमामा शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण व जिल्ह्यातील सर्व आमदार व ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसला बळकट करण्याचा संकल्प अभिषेक आव्हाड यांनी या बैठकीत केला आहे.

अभिषेक आव्हाड हे येणाऱ्या काळात सोलापूर जिल्ह्यातील युवकांची मोठी फौज अजितदादांच्या पाठीशी उभा करतील व संघटना वाढवतील यात तीळमात्र शंका नाही; असे दिसून आले.

# पोंधवडी येथे २६ डिसेंबरला मासिक पौर्णिमा उत्सव

करमाळा(सं.प्र.): नवसाला पावणारा मारूती देवस्थानच्या नावाने प्रसिध्द असलेल्या पोंधवडी येथे २६ डिसेंबरला मासिक पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. पोंधवडी येथील मारूती मंदिरात गेली १३ वर्षापासून प्रत्येक पौर्णिमेला मोठा उत्सव साजरा केला जात आहे. २६ डिसेंबरला १३५ वा मासिक पौर्णिमा उत्सव असून, यानिमित्त सकाळी सात ते नऊ श्री ला अभिषेक व नंतर साडेदहा ते साडेबारा झी टॉकीज फेम बालकिर्तनकार माऊली महाराज जाहुरकर (ता.मुखेड, जि.नांदेड) यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. तरी या पौर्णिमा उत्सवात भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे; असे आवाहन पोंधवडी ग्रामस्थांनी केले आहे.



प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

# ऊसतोडीसाठी मजूर देतो म्हणून आठ लाखाची फसवणूक

करमाळा (सं.प्र.) : ऊसतोडीसाठी ११ कोयते म्हणजे २२ मजूर देतो असे म्हणून आठ लाख रूपये घेऊन मजुरही दिले नाही व पैसेही दिले नाहीत. अशा मुकादमाविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी राजेंद्र ज्ञानदेव गव्हाणे (रा.पोफळज) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी कर्मयोगी सहकारी साखर कारखाना घागरगाव(ता.इंदापूर) यांचेबरोबर ऊस वाहतुकीसाठी करार केला होता. त्यानुसार मला ११ कोयत्यांची गरज होती. हे कोयते मी तुम्हाला देतो.. असे ऊसतोड मुकादम भारत एकनाथ गायकवाड (मुळगाव आटवाडी एकलहरे, ता.श्रीरामपूर, ह.रा.चिखलठाण नं.१) हा म्हणाला व त्यासाठी त्याने १ सप्टेंबर २०२२ रोजी आठ लाख रूपये उचल मागितली. त्यास एक लाख रूपये फोन पे ने तर बाकीचे सात लाख रूपये रोख देऊन नोटरी केली. त्यानंतर ठरल्या प्रमाणे त्याने कोयतेही दिले नाही व रक्कमही दिली नाही. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# लक्झरी बसला दोन्ही बाजूने धडक - बसचे नुकसान

करमाळा (सं.प्र.): लक्झरी बसला पाठीमागून जोराची धडक दिल्याने ही बस पुढच्या वाहनावर आदळून बसचे दोन्ही बाजुने नुकसान झाले आहे. हा प्रकार १८ डिसेंबरला पहाटे पाच वाजता करमाळा-जेऊर रस्त्यावर जेऊरवाडी फाट्याजवळ घडला आहे. या प्रकरणी योगलक्ष्मी ट्रॅव्हल्सचे ड्रायव्हर तानाजी भिकाजी साहणे (रा.नाशिक) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्ही नाशिकहून सोलापूरकडे १७ डिसेंबरला रात्री सव्वाआठ वाजता निघालो. १८ डिसेंबर ला पहाटे पाच वाजता करमाळा-जेऊर रस्त्यावरील जेऊरवाडी फाट्यानजीक समोरचा ट्रक हळू चालवत असल्याने मी माझी लक्झरी हळू चालवली. एवढ्यात पाठीमागील एका ट्रकने जोरात येऊन लक्झरी बसला पाठीमागून धडक दिली. त्यामुळे लक्झरी बस पुढील वाहनावर जाऊन आदळली. यावेळी बस मधील तीन-चार लोक किरकोळ जखमी झाले, पण बसचे पुढील शो व पाठीमागील बाजू खराब झाली आहे. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# जेऊर येथे बेकायदेशीर दारू विक्रेत्यावर कारवाई

करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथील लव्हे चौकात बेकायदेशीररित्या देशीदारू विक्री करताना एकजण आढळला असून पोलीसांनी त्यावर कारवाई केली आहे. हा प्रकार १७ डिसेंबरला दुपारी तीन वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल नितीन चव्हाण यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की जेऊर येथील लव्हे चौकात बेकायदेशीर दारू विक्री होत असल्याची माहिती समजल्यावर त्या ठिकाणी गेलो असता, आयुब रज्जाक शेख रा.पारेवाडी याचेकडे संत्रा कंपनीच्या ९८० रूपयाच्या १४ देशीदारूच्या बाटल्या सापडल्या आहेत. या प्रकरणी पोलीसांनी त्याच्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मित्राच्या लग्नाला आला आणि प्राण गमावून बसला

करमाळा(सं.प्र.) : मित्राच्या लग्नाला आला आणि अपघातात प्राण गमावून बसला.. अशी दुर्दैवी घटना सालसे येथे २६ नोव्हेंबरला रात्री घडली आहे. या प्रकरणी पुणेहून झिरो नंबरने गुन्हा दाखल होऊन करमाळा पोलीसाकडे चौकशीसाठी आला आहे. यात गजानन दशरथ जाधव (रा.इंदिरानगर, लोहगाव, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २६ नोव्हेंबरला दुपारी एक वाजता मी व माझा मित्र नवनाथ लक्ष्मण वाघमारे (वय-२६, रा.गुरूदास कॉलनी, लोहगाव, पुणे) असे आम्ही दोघे आमचा मित्र सुशांत हराळे याचे बारलोणी (ता.माढा) येथे लग्न असल्याने २६ नोव्हेंबरला आलो होतो. २६ नोव्हेंबरला हळदीचा कार्यक्रम रात्री नऊ वाजता संपला. त्यानंतर मी व माझा मित्र नवनाथ वाघमारे मोटारसायकल क्र.एमएच १६ डीएफ ५१७७ वरून पांडे येथील माझे नातेवाईकाकडे निघालो. नवनाथ वाघमारे हा मोटारसायकल चालवत होता. बारलोणी वरून सालसे गावाच्या पुढे आल्यानंतर नवनाथ वाघमारे याचा मोटारसायकलवरील ताबा सुटला व त्याने समोर जाणाऱ्या मालट्रकला पाठीमागून जोराची धडक दिली. त्यात अपघात झाला, त्यामध्ये माझा डावा हात फॅक्चर झाला, डोक्याला मार लागला तर नवनाथ यास नाकाला, तोंडाला व डोक्याला जखमा झाल्या. त्यात तो बेशुध्द पडला. मी माझे नातेवाईक माणिक भोसले (रा.पांडे) यांना हकीकत कळवली. ते तात्काळ तेथे ॲम्बुलन्स घेऊन आले व त्यांनी करमाळा उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉक्टरांनी नवनाथ वाघमारे हा मरण पावल्याचे सांगितले. मला त्यानंतर ससून हॉस्पिटल येथे उपचारासाठी आणले. या प्रकरणी पोलीसांनी मयताच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# आंब्यावाणी व्हता गाव...!

**कवितासंग्रह परिचय**


**झाली ऊसाची साखर**
**खाली उरलेली चोयी**
**आंब्यावाणी व्हता गाव**
**झाली झाली त्याची कोयी ॥धृ॥**
**ऊसा-कापसासकट**
**गाव गेलं चरख्यात**
**वेष घेवोनी कसाई**
**फिरत्याती गुराख्यात**
**आम्ही राहिलो भणंग**
**ज्याची त्याची केली सोयी**
**आंब्यावाणी व्हता गाव ॥१॥**
**झाली झाली त्याची कोय....**

या ओळी पोथरे येथील कवि हरिभाऊ हिरडे यांच्या 'आंब्यावाणी व्हता गाव' या कविता संग्रहातील आहेत. हरिभाऊ हिरडे हे अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून वाटचाल करत त्यांनी पदवी व पदवीत्तोर शिक्षण घेतले. काळ्या मातीत राहून, मातीशी इमान राखून, मातीला सन्मान देण्याचे काम त्यांनी विविध कवितातून केले आहे. त्यांच्या कविता हृदयाचा आरपार ठाव घेणाऱ्या कविता आहेत. केवळ यमक किंवा गेयता याचा विचार न करता त्यातील आशय अत्यंत महत्वाचा आहे.

'मुंग्या नांदतात' या कवितेत ते म्हणतात

**गोडी आणि एकोप्याचा**
**खातात गुळ ।**
**मातीच्या हो कणातूनी**
**साकारते वारूळ।**
**खोल जमिनीच्या पोटातूनी**
**माती शेंदतात ।**
**एकजीव होऊनी येथे**
**मुंग्या नांदतात ॥**

जे मुंग्याला समजते ते माणसाला का समजू नये.. इतका सरळ अर्थ या कवितेतून कवीने दिला आहे.




अशाचप्रकारे शेतकऱ्याची कहाणी मांडताना हे कवी म्हणतात..

**लोखंडाच्या नांगराने,**
**नांगरट करणारा बापही,**
**होता लोखंडाचाच...**
**पण**
**नांगरटीच्या कोणत्याच वळणावर**
**त्याला भेटला नाही...**
**कुठलाच परीस आणि माती**
**ढेकळात गंजून गेला**
**लोखंडाचा बाप..।**

'देवळे आणि पुतळे' या कवितेत खेड्यापाड्यातील लोकांनी मंदिरं उभारली आहेत. त्याच्या यात्रा भरवतात. अलिकडे या देवळाच्या भिंती निखाळत आहेत. शहरात पुतळे उभारले आहे. त्याच्या विटंबनेच्या बातम्या येतात आणि लोक पुतळा नाहीतर देश तोडतात. अतिशय समर्पकपणे समाजातील चित्र या कवीने मांडले आहे.

ओस पडलेल्या गावाचे चित्र मांडताना विज्ञानानं पाण्याचा आणि गावाचा घात कसा केला.. ते सुंदर मांडले आहे.

**पोहऱ्याने पाणी शेंदता येत होतं,**
**तोपर्यंतच विहिरीत होतं पाणी...**
**विहिरीवर आणि रस्त्यावर आली मोटार**
**मोटारीनं विहिरीतील पाणी खरडून शेंदलं,**
**तर दुसरीनं शेंदली गावातील माणसं...**
**आता विहिरीतही नाही पाणी**
**आणि गावातही नाही माणसं..**

बदलत्या शेतीचं चित्र मांडताना कवी हरिभाऊ हिरडे म्हणतात..

**पाणी शेंदता-शेंदता,**
**रक्त आम्हीच शेंदले**
**कसायाच्या दावणीला,**
**आम्ही गोकुळ बांधले...**
**दह्या दुधाचे रांजण,**
**आज पडले फुटून**
**होती सोन्याची ती शिंग,**
**कोणी नेली हो लुटून**
**काळ्या आईचा दरबार,**
**आज वाटतो भकास**
**दूध देणाऱ्या गायीची,**
**कशी आटली हो कास**

अशा एक ना अनेक कविता या हृदयाचा ठाव घेणाऱ्या कविता आहेत.

शेतकऱ्याचा संप, बाळासाठी माय, होरपळ, आभाळाची दहिहंडी, विठ्ठल कारभारी, सुगीचे हे दिस, लोकशाही, रक्तचंदन, सिनिमा अशा कवितासंग्रहात ५८ कविता आहेत. साहित्य अकादमी पुरस्कार विजेता कवी ऐश्वर्य पाटेकर यांची प्रस्तावना लाभलेला व यशोदिप पब्लिकेशन्स पुणे यांनी प्रकाशित केलेला हा कवितासंग्रह आहे. या कविता संग्रहासाठी महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखन अनुदान योजनेत अनुदान मिळाले आहे.

अतिशय वाचनीय हा कविता संग्रह असून करमाळा तालुक्यातील मान्यवर कवीच्या रांगेत हा कवितासंग्रह गेलेला आहे. तो आपण नक्की वाचावा...!

***

## ग्रामायण भाग-५

सन १९८२ च्या विजयादशमी दिवशी रूग्णालयाच्या इमारतीत प्रवेश करून रूग्णालयाचा आरंभ केला. मॅटर्निटी, स्नेकबाइट, पॉयझनींग आदी प्रकारचे रूग्ण मोठ्या संख्येने येत होते. दहा ते बारा बेडस् सतत भरलेले असत. डॉ.प्रदीप माखन खूप दिवस येत होते. डॉ.शारदा सुराणा यांचेही मोठी मदत मिळू लागली. डॉ.मन्मंथ राऊत तसेच एन.आर.शहा हे ही हॉस्पिटलला येत होते. माझा भाऊ डॉ.राजेंद्र हा यु.के. ला जायी पर्यंत जेऊरला येत असे. अत्यंत कमी शुल्क मध्ये येऊन ही सर्व मंडळी काम करत होते. कधीही एक हजार रूपया पेक्षा जास्त बिल होत नव्हते. त्यावेळी अनेक रूग्ण आम्ही खाली झेपतो पण आम्हाला कॉटचे भाडे लावू नका; असेही म्हणत होते. त्यांच्या अपेक्षेपेक्षा त्यांचा खर्च कमी होत होता. सन १९८३ ते १९९० आम्ही मोफत लसीकरण केले. पोलिओ ट्रिपलसाठी शेकडो बालके येत असत. सुरूवातीला १० रू. घेत असत आणि लसीकरण नियमित पणे पूर्ण झाले की ती रक्कम त्यांना परत देत असे. आम्हाला लसीकरण महत्वाचे वाटत होते तर आम्हाला दहा रू. महत्वाचे वाटत होते. ट्युबरक्लोजिस व लेप्रसिचे प्रमाण त्या काळात जास्त होते. त्यासाठी मोफत निदान व ट्रिटमेंट सेंटर सुरू केले. याकरीता आम्हाला एक्स-रे मशीनची गरज होती. त्यामुळे आम्ही ६० एमए चे छोटे मशीन घेतले. त्याची माहिती डॉ.माकन (सांगवी, पुणे) येथे जाऊन घेतली. धुळ्याहून मेहुणे रेडिओलॉजीस्टची माहिती दिली. त्यामुळे त्याची मला खुप मदत झाली. डॉ.शारदा डी.जी.ओ. झाल्यानंतर १९८३ ला हॉस्पिटलला जॉईन झाल्या आणि त्यानंतर प्रसुति विभाग वाढला. त्यावेळी १० ते १२ तास वीज पुरवठा बंद होता. कंदिल आणि पेट्रोमॅक्सच्या उजेडात छोटं बाळ जग बगायचा. जर काही अडचण आलीच तर त्या बाळावर तात्काळ उपचार व्हावेत म्हणून एक जीप घेतली व तातडीने कुर्डूवाडी गाठून त्यावर उपचार केले जायचे. ९९ टक्के बाळाला कोणताही प्रश्न उद्भवत नसे. १९८६ ला करमाळा तालुक्यातील पण इंदापूरला डॉ.कदम यांनी लहान मुलांचा दवाखाना सुरु केला. त्यानंतर मुलांची खूप चांगली सोय होवू लागली.

...डॉ.सुभाष सुराणा, जेऊर. मो.८९७५५४१०६०

## सोलापूर जिल्हा नियोजन मंडळामधून
# रस्त्यांसाठी ३ कोटी ७२ लाख निधी मंजूर

करमाळा(सं.प्र.) : जिल्हा नियोजन समिती सोलापूर यांच्या निधीतून जिल्हा वार्षिक योजन २०२३-२४ मध्ये लेखाशीर्ष ३०५४-२०८१ अंतर्गत ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण करणे यासाठी ३ कोटी ७२ लाख निधी मंजूर झाला आहे. तालुक्यासाठी २ कोटी ६४ लाख तर ३६ गावासाठी १ कोटी ८ लाख असा ३ कोटी ७२ लाख निधी मंजूर झाला आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली. याबाबत अधिक माहिती देताना आ.शिंदे म्हणाले, की तालुक्यातील ग्रामीण मार्गाच्या विकासासाठी गुळसडी ते खंडागळे वस्ती, वडगाव पठाण वस्ती जोडमार्ग, घोटी ते क्षीरसागर वस्ती, निंभोरे ते साखर कारखाना, लव्हे ते कवडे वस्ती, वांगी नं.३ ते आदिनाथ कारखाना, पाडळी ते साळुंखे वस्ती, वांगी नं.१ ते मंगवडे रस्ता, फिसरे ते सौंदे रस्ता हे ग्रामीण मार्ग तसेच देवळाली, पांडे, अर्जुननगर रस्ता., सौंदे गुळसडी देवळाली रस्ता, आवाटी नेरले रस्ता या इतर जिल्हा रस्त्यांसाठी असा २ कोटी ६४ लाख निधी करमाळा तालुक्यासाठी मंजूर झाला आहे; असेही आमदार शिंदे यांनी सांगितले.

# नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये क्रिडा सप्ताहची सुरूवात



करमाळा(सं.प्र.): श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुलमध्ये २२ डिसेंबर पासून क्रिडा सप्ताहास सुरूवात झाली आहे. या क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन यशकल्याणीचे गणेश करे-पाटील यांचे हस्ते झाले. या क्रिडा सप्ताहमध्ये मुलांचे चार ग्रुप करण्यात आले असून यामध्ये विविध क्रिडा स्पर्धा संपन्न होणार आहेत. उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, संचालिका सुनिता देवी, अमोद संचेती, विजयकुमार दोशी, चंद्रकांत देवी, वाशिंबेकर व पालक वर्ग उपस्थित होते. सुत्रसंचालन पल्लवी ढाळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका सुनिता मोहिते यांनी मानले.


ऋणानुबंध वृध्दिंगत करणारा योग
गुरुपुष्यामृतयोग
गुरुवार
दि.२८/१२/२०२३
शुध्द सोने.. अमूल्य नाते..
AJK Anandi Jewellers
आनंदी ज्वेलर्स
जय महाराष्ट्र चौक, मेनरोड, करमाळा • फोन (02182)222209. Mo.9420915099


'भैरवनाथ शुगर्स' चे
कार्यकारी संचालक व आमचे मित्र
मा.श्री.
किरण सावंत
दि.२४ डिसेंबर रोजी असलेल्या
वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
श्री.नानासाहेब मोरे
शुभेच्छुक
गुरूदत्त एंटरप्रायजेस्, करमाळा.
श्री.भरत आवताडे (उद्योजक)